## फौ. कि. अर्ज नं. १५४/२०१४
## नि. ५ वरील आदेश

१. सदरचा अर्ज अर्जदार हिने कौटुंबिक हिंसेपासून स्त्रियांचे संरक्षण कायदा, २००५ चे कलम १२ अन्वये अंतरिम पोटगी मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचा अर्ज वाचला. जाबदेणार क्रं. १ व २ यांनी नि. १८ व जाबदेणार क्रं. ३ व ४ यांनी नि. २० अन्वये दिलेला जबाब वाचला. अर्जदाराचे वकीलांचे आणि जाबदेणार यांच्या वकीलांचे म्हणणे ऐकून घेतले. अर्जदारांचे म्हणणे असे आहे की, अर्जदार हिने जाबदेणार यांच्या विरूध्द कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रीयांचे संरक्षण कायदा, २००५ चे कायद्यानुसार अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार हिचा विवाह  मयत सतिष तान्हाजी वामन याच्यासोबत मौजे उंब्रज, ता. जुन्नर येथे झाला.  अर्जदार हिचा विवाह झाल्यानंतर अर्जदार ही नांदावयास गेली. लग्नानंतर जाबदेणार यांनी महिनाभर चांगले व व्यवस्थीत नांदविले. त्यानंतर  तुला स्वयंपाकच येत नाही, लग्नात तुझे वडिलांनी मानपान केला नाही, अशा कारणांनी सतत त्रास देत असत.

३. दि.११/११/२०१२ रोजी आजारपणात अर्जदाराचे पतीचे निधन झाले. त्यानंतर सर्व जाबदेणा—यांच्या वागण्यात आचानक मोठा फरक पडला. पती वारल्यानंतर  त्यांच्या तेराव्यास  अर्जदार हिचा दिर सुनिल याने आत तुझा आमच्याशी काही संबध नाही, तु आमच्या घ रात राहायचे नाही निघून जा.  अर्जदाराचा नांदवा म्हणजे जाबदेणार नं१ हे जाबदेणार नं३ सुनिल हे सुनिलच्या पूर्णपणे आहारी गेल्यामुळे

तसेच अर्जदार हिचे पती मतय झाल्याने व जाबदेणार नं३ याला एड्स असल्यामुळे व त्याला दोन मुली असल्यामुळे सदर गोष्टीचा फायदा घ ोवून जाबदेणार क्र १ याचे संपूर्ण इस्टेट हडप करण्यासाठी जाबदेणार नं. ४ हे जाबदेणार नं१ याचे कान भरीत असत. अशा प्रकारे जाबदेणारं यांनी अर्जदार हिचा आतोनात छळ करून तिला मानसिक त्रास दिला. आज रोजी अर्जदार ही तिच्या माहेरी राहत असून ती तिचा चारितार्थ करू शकत नाही म्हणून अर्जदार हिने कायद्याचे कलम १२ प्रमाणे अंतरिम ही अर्ज दाखल तारखेपासून मिळण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदार हिस कोणताही कामधंदा नाही तसेच उदरनिर्वाहाचे साधन नसल्यामुळे ती केवळ आश्रिताचे जीवन जगत आहे. जाबदेणार नं. १ याने रू.५,०००/— प्रमाणे पोटगी देण्याचा हुकूम व्हावा अशी अर्जदाराने न्यायालयास विनंती केली आहे.

४.　　जाबदेणार याचे म्हणणे असे आहे की, अर्जदार हिचा अर्ज हा कायदेशिर नसून खारिज होण्यास पात्र आहे. त्यांनी अर्जदार हिच्या अर्जातील सर्व मजकूर नाकारला. अर्जदार हिने जाबदेणार नं. १ यास त्रास देण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे. जाबदेणार नं. १ ने अर्जदार सोबतचे नातेसंबंध मान्य केले. तसेच जाबदेणार नं. १ हा वयस्कर असून त्यास उत्पन्नाचे कोणतेही साधन नसून तो अर्जदार हिला अंतरिम पोटगी देण्यास असमर्थ आहे.

५.　　जाबदेणारांनी अर्जदारासोबतचा नातेसंबंध नाकारलेला नाही. या प्रकरणामध्ये अंतरिम पोटगी देताना अर्जदार ही आर्थिकदृष्टया असमर्थ आहे किंवा नाही हे पहाणे जरूरीचे आहे व हा अर्ज निकाली करण्यासाठी हा एकमेव मुद्दा विचाराधीन आहे. अर्जदार हिने तिचे

कथनाच्या पृष्ठार्थ गाव मौजे काळवाडी, ता.जुन्नर येथील खाते नं.१२९ चा ८ अ चा खातेउतारा व गट नं. २/२अ,२/२ब व १/५ चे ७/१२ उतारे व ग्रामपंचायत मिळकत नं.२०५ चे मिळकतीचे उतारे दाखल केले. अर्जदार हिला तिचा चारितार्थ चालविण्यासाठी असमर्थ असल्यामुळे तिला उदरनिर्वाहासाठी अंतरिम पोटगी मिळणे आवश्यक आहे असे सांगितले. याउलट जाबदेणार यांच्या वकीलांनी युक्तीवादात अर्जदार हिची आर्थिक परिस्थिती बिकट आहे हे पुराव्याद्वारे अर्जदार हिने शाबीत केले नाही व जाबदेणार नं.१ ला औषधोपचाराकरिता खर्च करावे लागतो म्हणून जाबदेणार नं.१ हा अर्जदारास हिस पोटगी देण्यास असमर्थ आहे असे सांगितले.

६. कौटुंबिक हिंसेपासून स्त्रीयांचे संरक्षण कायद्याचा प्रमुख उद्देश म्हणजे स्त्रीयांवर कुटुंबात होणा—या कोणत्याही प्रकारच्या हिंसाचारापासून संरक्षण प्रदान करणे असा आहे. या अधिनियमा अंतर्गत कोणतेही कृत्य किंवा कोणतेही वर्तन ज्यामुळे पिडीत महिलेस शारिरीक तसेच मानसिक नुकसान किंवा इजा पोहचेल व ज्यामुळे तिच्या जिवीतास व आरोग्याच्या सुरक्षिततेस धोका निर्माण होईल अशा प्रकारचे कृत्य त्याचप्रमाणे हुंडा किंवा संपतीची अयोग्य मागणी व त्यासाठी तिचा शारिरीक व मानसिक छळ करणे असे वर्तन घरगुती हिंसाचाराच्या अंतर्गत येते. अर्जदार हिने कथन केल्याप्रमाणे तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे स्पष्टपणे दिसते व त्यामुळे तिला कायद्य ाप्रमाणे दिलासा मिळणे गरजेचे आहे.

७. वरील सर्व परिस्थितीचा व दोन्ही वकीलांच्या युक्तीवादाचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदार

हिस जाबदेणार क्रं. १ हा पोटगी देण्यास समर्थ आहे. तसेच अर्जदार हि एड्स ग्रस्त असून तीला औषधोपचारासाठी पैशाची आवश्यकत आहे व ती तीचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे असे निदर्शनास येते. तरी प्रथमदर्शनी जाबदेणार नं.१ अर्जदार हिस रक्कम रू.३,०००/—प्रमाणे प्रतिमहा अंतरिम पोटगी मिळणे आवश्यक आहे. या पोटगी रक्कमेचा बोजा हा जाबदेणार यांच्यावर जास्त पडणार नाही व ती रक्कम अर्जदार यांच्यासाठी पुरेशी ठरेल असे माझे मत झाले आहे, त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्जदार हिचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. जाबदेणार नं. १ याला असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अर्जदार हिला दरमहा रू.३,०००/— दरमहा प्रमाणे अंतरिम पोटगी हा अर्ज दाखल तारखेपासून या प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत द्यावी.

३. अर्जदार हिला आदेशाची प्रत विनाशुल्क मोफत देण्यात यावी.

जुन्नर

दिनांक : ३०/११/२०१५

(श्रीमती. आर.एस. राय)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, जुन्नर,
जि. पुणे